<u>वादीतर्फे पुढील सरतपास वकिल श्री. ए. एल. वेलदे यांच्यातर्फे शपथेवर पुढे सुरु</u>

०८. माझ्या सरतपासणी शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिला असून तो खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे.

०९. प्रतिवादी यांच्या विरुध्द माझ्या वडिलांनी ग्रामपंचायत शहरटाकळी येथे दिलेला अर्ज दि. ०५/०८/२०१५ रोजीचा अर्ज प्रस्तुत प्रकरणात दाखल आहे. त्यावर माझ्या वडिलांची सही आहे. त्यांची सही मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ६८** देण्यात येते. त्यानंतर माझ्या वडिलांनी प्रतिवादींना वकिल साहेबामार्फत दि. ३१/०८/२०१५ रोजी नोटिस दिली. सदर नोटिसची स्थळप्रत प्रकरणामध्ये दाखल केली आहे. त्यावर वकिल साहेबांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ६९** देण्यात येते. त्यानंतर ग्रामपंचायत शहरटाकळी यांनी प्रतिवादी योहान कोल्हे यांना बांधकाम बंद करणेबाबत दि. ०१/०९/२०१५ रोजी नोटिस दिली. सदरची नोटिस ग्रामसेवक यांनी दिली. सदर नोटिसवर ग्रामसेवक यांची सही आहे. सदरची नोटिस मी दाव्यात दाखल केली आहे. मी प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादीने बांधकाम केल्याबाबतचे तीन फोटो दाखल केले आहेत. सदर प्रकरणात प्रतिवादीला माझ्या वडिलांनी पाठवलेली नोटिस मिळालेबाबतची पोहोच पावती प्रकरणामध्ये दाखल केली आहे. त्यावर प्रतिवादीची सही आहे. त्यास **नि.क्र. ७०** देण्यात येते.

सरतपास पूर्ण

<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे वकिल श्री. बी. आर. शिंदे यांच्यामार्फत</u>

१०. हे म्हणणे खरे आहे की, मी शहरटाकळी येथे व्यापार करतो. हे म्हणणे खरे आहे की, मी सवर्ण समाजाचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे शिक्षण भरपूर झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयामध्ये स्वच्छ मनाने दावा दाखल करावा लागतो याची मला जाणीव आहे. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयामध्ये दावा दाखल करताना कायद्याचे पालन झाले पाहिजे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतचा दावा हा दि. ०४/०२/२०१५ रोजी दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल करताना मी नि.क्र. १ मध्ये नमूद केलेल्या वादग्रस्त मिळकतीच्या चतु:सीमा नमूद केल्या.

प्रश्न दावा दाखल करताना वादग्रस्त मिळकतीच्या दक्षिण बाजूला सिटी सर्वे क्र. २५१ व बोळ नमूद केले आहे ?

उत्तर  सदरची चतुःसीमा चूकीने लिहिल्या गेली होती.

प्रश्न  दावा दाखल करताना वादग्रस्त मिळकतीच्या उत्तर बाजूला रस्ता नमूद केला आहे

उत्तर  सदरची चतुःसीमा चूकीने लिहिल्या गेली होती.

११.  प्रस्तुत दाव्यामध्ये मी प्रतिवादीविरुध्द नि.क्र. ५ वर तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केला होता किंवा कसे हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडिलांनी तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज प्रतिवादीविरुध्द दाखल केला होता. सदर अर्जामध्ये दाव्याच्या चतुःसीमेप्रमाणेच चतुःसीमा नमूद केल्या होत्या किंवा कसे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिल व मी एकाच कुटूंबात राहतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यांचे वय झाल्यामूळे घरातील व्यवहार मीच बघत होतो. साक्षीदार स्वतःहून सांगतो की ते मयत झाल्यानंतर मी बघत होतो. प्रस्तुतचा दावा मी माझ्या वडिलांसोबत विचार विनीमय करुन एकमताने दाखल केला किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश दि. २२/२/२०१६ रोजी झाला असून सदरचा अर्ज मंजूर झाला किंवा कसे हे मला सांगता येणार नाही.  नि.क्र. ५ वरील तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश आमच्या फायद्याच्या चतुःसीमा दाखवून आमच्यासारखा करुन घेतला किंवा कसे हे मला सांगता येणार नाही.

प्रश्न  तुमच्या हक्कात तात्पुरता मनाई हुकूम मंजूर झाल्यानंतर तुम्ही अक्कलहुशारीने चतुःसीमा दुरुस्तीचा अर्ज दिला ?

उत्तर  चतुःसीमा चूकलेल्या होत्या म्हणून सदरचा अर्ज दिला.

१२.  सदर अर्जाचा आदेश आमच्या बाजूने झाला किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या हक्कामध्ये दाव्याचा निर्णय घेण्यासाठी कायद्याचे उल्लंघन करुन गुन्हा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी न्याय यंत्रणेची दिशाभूल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी विरुध्द खोडसाळपणे वागलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुतचा दावा स्वच्छ हाताने दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यात व प्रतिवादीमध्ये निर्माण झालेला वाद हा सरकारी रस्त्यावरुन झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, गावातील सार्वजनिक रस्ते हे सरकारच्या मालकीचे असतात.  हे म्हणणे खरे आहे की, सदर सार्वजनिक रस्त्यावर कोणी नासधूस केल्यास त्याविरुध्द दाद मागण्याचा आधिकार सरकारला प्राप्त होतो. साक्षीदार स्वतःहून सांगतो की सदर रस्त्याचा वापर आम्ही करत होतो. हे म्हणणे खरे आहे की, वादग्रस्त रस्ता हा माझ्या मालकीचा नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामूळे मला प्रतिवादी विरुध्द या रस्त्याबाबत दावा दाखल करण्याचा अधिकार नाही.  प्रतिवादी बांधकाम करत असलेली जागा त्यास शासनाकडून इंदिरा

आवास योजनेमध्ये मिळालेली आहे किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी घरकुलाचे बांधकाम करत असताना माझ्या वडिलांनी ग्रामपंचायतीकडे प्रतिवादीविरुध्द तक्रारी अर्ज दिला होता.

प्रश्न तुमच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारी अर्जामध्ये ग्रामपंचायतला तथ्य दिसले नाही त्यामूळे प्रतिवादीविरुध्द कोणतीही कारवाई केली नाही ?

उत्तर ग्रामपंचायतीने प्रतिवादीला काम बंद करण्याची नोटिस दिली.

१३. प्रतिवादी याने घरकुलाचे बांधकाम सन २०१६ साली पूर्ण करुन तो त्याठिकाणी राहतो किंवा कसे याबाबत मला माहिती नाही.

**प्रतिवादीच्या विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन उर्वरित उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब**

श्रवणोत्तर स्वीकृत

RAMESH RAOJI BHADRE Digitally signed by RAMESH RAOJI BHADRE Date: 2026.01.21 16:46:05 +0530

दि. २१/०१/२०२६

( आर. आर. भद्रे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
शेवगाव